**ठळक बातम्या**

- ओला दुष्काळ जाहीर करणं नियमात बसत नसल्याचं मुख्यमंत्र्यांचं स्पष्टीकरण, तरीही दुष्काळाच्या सवलती लागू करण्याचं आश्वासन
- औद्योगिक, वाणिज्यिक आणि इतर वर्गवारीतल्या ग्राहकांकडून वीज वापरावर अतिरिक्त वीज विक्री कर आकारायला मंत्रिमंडळाची मंजुरी
- बिहार विधानसभा निवडणुकांसाठीची अंतिम मतदार यादी आज जाहीर होणार

**आणि**

- आयसीसी महिला विश्वचषक क्रिकेट स्पर्धेला आजपासून सुरुवात, भारत आणि श्रीलंका यांच्यात पहिली लढत

**<><><><><>**

राज्यात अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीच्या पार्श्वभूमीवर ओला दुष्काळ जाहीर करणं नियमात बसत नाही, मात्र दुष्काळासाठी ज्या सवलती लागू केल्या जातात तशाच सवलती लागू केल्या जातील, असं मुख्यमंत्री देवेंद्र फ़डनवीस यांनी म्हटलं आहे. ते आज मुंबईत मंत्रिमंडळ बैठकीनंतर वार्ताहरांशी बोलत होते.

**होल्ड बाईट मुख्यमंत्री**

राज्यात अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचा आढावा मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. राज्यात ६० लाख हेक्टरचं नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे, सरकारने ऑगस्टपर्यंतच्या नुकसानीसाठी २ हजार २१५ कोटी रुपये वितरित करायला सुरुवात केली आहे, असं मुख्यमंत्री म्हणाले. पुढच्या दोन तीन दिवसांत नुकसानीची सर्व माहिती राज्य सरकारला मिळेल, त्यानंतर मदतीची घोषणा पुढच्या आठवड्यात करू, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. केंद्र सरकारकडे नुकसानीचा अहवाल पाठवला जाईल, मात्र दिल्लीच्या मदतीची वाट न पाहता

राज्य सरकार आपदग्रस्तांची मदत करेल, असं त्यांनी स्पष्ट केलं. अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर वसुली न करण्याचे निर्देश बँकांना दिल्याचंही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितलं.

**<><><><><>**

अतिवृष्टीमुळे राज्यातल्या २४ जिल्ह्यांमधले १३७ तालुके बाधित झाले आहेत. अशा वेळी शेतकऱ्यांना बँकेकडून कर्जवसुलीच्या नोटीसा कशा बजावण्यात आल्या, असा सवाल काँग्रेसचे विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. ते आज मुंबईत वार्ताहरांशी बोलत होते.

**<><><><><>**

राज्य सरकार कर्करोग उपचारासाठी सर्वसमावेशक असं धोरण आखून प्रत्येक जिल्ह्यात नागरिकांना कर्करोगावर दर्जेदार उपचार उपलब्ध करुन देणार आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या आज झालेल्या बैठकीत याबाबत निर्णय झाला. त्यानुसार त्रिस्तरीय समग्र कर्करोग उपचार सेवा निश्चित केली जाईल. राज्यभरात १८ रुग्णालयांमधे कर्करोगाशी निगडीत विशेषोपचार उपलब्ध होतील. यासाठी १०० कोटी रुपये भाग भांडवलाची महाकेअर, अर्थात महाराष्ट्र कॅन्सर केअर, रिसर्च अँड एज्युकेशन फाऊंडेशन ही कंपनी स्थापन केली जाणार आहे.

औद्योगिक, वाणिज्यिक आणि इतर वर्गवारीतल्या ग्राहकांकडून वीज वापरावर अतिरिक्त वीज विक्री कर आकारायला आज मंत्रिमंडळानं मंजुरी दिली. राज्याचं जागतिक क्षमता केंद्र धोरण २०२५, तसंच महाजिओटेक महामंडळ स्थापन करायलाही मंत्रिमंडळानं मंजुरी दिली.

**<><><><><>**

एकविसाव्या शतकात सशस्त्र दलांमधली परस्परांबरोबर समन्वय साधून काम करण्याची क्षमता आणि एकता, ही परिचालनात्मक गरज बनली आहे, असं संरक्षण

मंत्री राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्ली इथं त्री-सेवा परिषदेत बोलत होते. सुरक्षेपुढले धोके गुंतागुंतीचे बनले आहेत, असं ते यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी दुर्गा पूजा उत्सवानिमित्त देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. हा उत्सव देशाची संस्कृती, श्रद्धा आणि आध्यात्मिक वारशाचं प्रतीक आहे, अशी भावना राष्ट्रपतींनी व्यक्त केली. महिलांचा सन्मान राखण्यासाठी आणि समाजात त्यांचं योग्य स्थान जपण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत असं आवाहन त्यांनी केलं. तर हा उत्सव प्रत्येकाच्या आयुष्यात आनंद, आरोग्य आणि शांती घेऊन येवो, अशी प्रार्थना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केली.

**<><><><><>**

सेवा आणि सुशासन या मार्गदर्शक तत्त्वांनुसार वाटचाल करत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालचं केंद्र सरकार सतत कार्यरत आहे. सेवा पर्व या मालिकेत आज आपण शिक्षण क्षेत्रातल्या सुधारणांबद्दल जाणून घेणार आहोत.

**व्हीसी (१.४० सेकंद)**

*(मागील अकरा वर्षांमध्ये शाळांपासून विद्यापीठांपर्यंत शिक्षण व्यवस्थेला बळकटी आणण्याच्या बाबतीत भारताने वेगानं प्रगती केली आहे. निपुण भारत अभियान, पीएम श्री योजना, राष्ट्रीय अभ्यासक्रम धोरण, राष्ट्रीय क्रेडीट फ्रेमवर्क अशी पावलं उचलून शिक्षण व्यवस्थेमध्ये लवचिकता, बहुशाखीय ज्ञान आणि आंतरराष्ट्रीय स्तर आणायला सरकारने प्राधान्य दिलं आहे.* IITs, IIMs *आणि* AIIMS *सारख्या संस्थांचा विस्तार करत सरकारने सर्वांसाठी गुणवत्तापूर्ण आणि आधुनिक शिक्षण प्रणालीचा पाया रचला. जुलै २०२० मध्ये सरकारने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणलं. यातून शालेय तसंच उच्च शिक्षणात सुधारणा करत तंत्रज्ञानविषयक शिक्षणाचा समावेश केला आहे. याबाबत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी नवी दिल्लीत युग्म कॉनक्लेवमध्ये म्हणाले)*.......

***होल्ड बाईट मोदी***

*(२०१४ -१५ मध्ये शाळा आणि महाविद्यालयांची संख्या ५१ हजार होती. ही संख्या आता सत्तर हजारांवर गेली आहे. २०१४ पासून एम्सची संख्या सात वरुन २३ वर तर वैद्यकीय महाविद्यालयांची*

*संख्या ३८७ वरुन दोन हजारांवर गेली आहे. या सर्व प्रयत्नांमुळे देशाचा युवावर्ग सक्षम होईल आणि भारत एक विकसित राष्ट्र म्हणून स्थापित होईल.)*

**<><><><><>**

बिहार विधानसभा निवडणुकांसाठीची अंतिम मतदार यादी आज जाहीर होणार आहे. राज्यातल्या विधानसभा निवडणूका याच मतदार यादीच्या आधारावर होतील. निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर आज दुपारपर्यंत मतदार याद्या उपलब्ध होतील.

मतदार यादीच्या प्रती सर्व जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांना, आणि जिल्हा दंडाधिकाऱ्यांना उपलब्ध करून दिल्या जातील. तसंच सर्व मान्यताप्राप्त राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय राजकीय पक्षांना देखील अंतिम मतदार याद्या दिल्या जातील. बिहार मध्ये राबवण्यात आलेल्या विशेष पुनरिक्षण प्रक्रियेनंतर १ ऑगस्ट रोजी मतदार याद्यांचा मसुदा प्रकाशित झाला होता. यामध्ये आपले गणना अर्ज सादर करणाऱ्या ७ कोटी २४ लाखापेक्षा जास्त मतदारांची नावं समाविष्ट करण्यात आली होती.

**<><><><><>**

वस्तू आणि सेवा कररचनेतल्या सुधारणा २२ तारखेपासून लागू झाल्या आहेत. त्यात क्रीडा साहित्याबाबत केलेल्या कर सुधारणांविषयी आज जाणून घेऊया…

## होल्ड…कॅप्सूल (४५ सेकंद)

*(केंद्रसरकारने वस्तू आणि सेवा करामध्ये केलेल्या सुधारणांमध्ये खेळणी आणि क्रीडा साहित्यावरचा वस्तू आणि सेवा कर १२ टक्क्यांवरुन ५ ट्क्क्यांवर आणला आहे.  या सुधारणेमुळे ग्राहक आणि क्रीडा सहित्य विक्रेत्यांना दिलासा तर मिळेलच तसंच स्वदेशी खेळण्यांच्या उद्योगालाही चालना मिळेल. खेळण्यांवरचा जीएसटी कमी केल्यामुळे मुलांना खेळाला प्रोत्साहन मिळेल. खेळण्याचे स्वदेशी उत्पादक हे लघू आणि मध्यम उद्योजक आहेत, त्यांना या कररचनेतील सुधारणेमुळे स्वदेशी आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत उतरण्यासाठी बळ मिळेल.*

*वस्तू आणि सेवा कर परिषदेने सायकलवरचा जीएसटी १२ टक्क्यावरून ५ टक्क्यांपर्यंत आणला आहे. यामुळे सायकल परवडणाऱ्या दरात मिळू लागतील यातून फिरस्ते, ग्रामीण भागातल्या व्यक्ती आणि विद्यार्थ्यांना फायदा होईल. एवढंच नाही तर पर्यावरणपूरक जीवनशैलीला चालना मिळेल.)*

**<><><><><>**

आयसीसी महिला विश्वचषक क्रिकेट स्पर्धेला आजपासून सुरुवात होत आहे. या स्पर्धेतला पहिला सामना आज भारत आणि श्रीलंका संघांमध्ये गुवाहाटी इथं थोड्याच वेळात सुरू होईल. श्रीलंकेने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आहे.

भारत आणि श्रीलंका या देशांसह ऑस्ट्रेलिया, इंग्लंड, न्यूझीलंड, दक्षिण अफ्रिका, बांग्लादेश आणि पाकिस्तानच्या महिला संघांमध्ये प्राथमिक फेरीचे २८ सामने होतील.

**<><><><><>**

राज्यात अनेक ठिकाणी पाऊस ओसरला असून पाणी पातळी नियंत्रित करण्यासाठी विविध धरणांमधून विसर्ग करण्यात येत आहे. जायकवाडी प्रकल्पातून सध्या १ लाख २ हजार क्युसेक्स इतका विसर्ग सुरू आहे. राज्यात पूरग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदतीचा ओघही सुरू झाला आहे. अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मदत म्हणून धाराशिव जिल्ह्यातल्या उमरगा तालुक्यातल्या माऊली प्रतिष्ठानने मुख्यमंत्री सहाय्यता निधीला १ लाख १ हजार १११ रुपये दिले आहेत. धाराशिव जिल्ह्यात लोहारा तालुक्यात नागुर इथे पुराच्या पाण्यात वाहून गेलेल्या बालाजी व्यंकट मोरे या शेतकऱ्याच्या कुटुंबाला जिल्हा प्रशासनाने ४ लाख रुपयांची आर्थिक मदत केली आहे.

दरम्यान, येत्या २ दिवसांत कोकण, गोवा, मध्य महाराष्ट्रात हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडेल, असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**//<><><><><>//**